जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २१४** **दिनांक :- १०/०८/२०२१**

## भाईंदर रेल्वे स्टेशन परिसरात चालणा-या वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०६ पिडित मुलींची सुटका.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे वपोनि श्री. एस.एस.पाटील यांना भाईंदर रेल्वे स्टेशन समोर, रिक्षा स्टॅन्डलगत असलेल्या साईबाबा स्वीट आणि फरसाण मार्ट या दुकानाच्या बाजुस, भाईंदर पश्चिम येथे एक महिला वेश्यादलाल नामे मोयना हि पुरुष गि-हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरविते अशी गोपनीय माहिती मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गि-हाईक व पंच यांना पाठवुन मिळालेल्या गोपनीय बातमीची सत्यता पडताळुन दि.०९.०८.२०२१ रोजी २२.४५ वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल नामे मोयना आरिफ खातुन मंडळ, वय-३२ वर्ष, रा. उमेला, नायगाव (प.) ता.वसई, जि.पालघर, मुळ रा. चौविस परगाना, राज्य-पं.बंगाल ही वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गि-हाईकाकडुन पैसे स्वीकारुन मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तिला वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०६ मुलींची सुटका केली. सदर बाबत महिला वेश्यादलाल मोयना आरिफ खातुन मंडळ, वय-३२ वर्ष, हिचे विरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे पो.हवा./१९८७ विजय विनायक ढेमरे यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन भाईंदर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.I ३१९/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे श्री. संपतराव पाटील वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोहवा. विजय ढेमरे, रामचंद्र पाटील, पो.ना.यम्बर, कमल चव्हाण, केशव शिंदे, गावडे व भाईंदर पोलीस ठाण्याचे श्री. बगदाने पोउप.निरी, श्री ढलपे सहा.पो.उप.निरी, पो.ना.सोनावणे यांनी केली आहे.

---------------ooooooooo------------------